K.E.M. HOSPITAL RESEARCH CENTRE, PUNE

# Newsletter

CHAIRPERSON DR. R. A. MASHELKAR FRS
EDITOR DR. V. S. PADBIDRI

FOR PRIVATE CIRCULATION ONLY

EDITORIAL BOARD

DR. DEEPAK PHALGUNE
DR. MRS. VAIJAYANTI PATWARDHAN
DR. MRS. LAILA GARDA

January 2010 Volume 20 Number 1

## New RCH-II team joins KEMHRC

With season's greetings to one and all on occasion of the New Year. Close to New Year we received the good news that our Chairperson, Dr. R. A. Mashelkar was appointed as a member of the Scientific Advisory Council to the Prime Minister. We offer him our felicitations on being bestowed with this honor.



Scientific activities continued to be carried out as usual in the various departments.

In collaboration with the Commissioner, Persons with Disability, Maharashtra State, Pune, the State Level & NGO Co-ordination Meeting under the Rehabilitation of disabled children (RDC) project was conducted by the Research Centre on 13th November 2009. 76 delegates representing various government departments and NGOs associated with the execution of RDC project attended the meeting.

Dr. Vinitbhai Shah, Trustee, IMPACT, UK accompanied by Mrs. Hema Udeshi, PNR, Bhavnagar, came to Pune on 22nd December 2009 to see the progress of RDC project. They first went to Sivapur village where they met some of the beneficiaries under the RDC project and then "Era Education Society's" BEd and DEd College in Arvi village, before returning to Mumbai.

Our RCH-II team organsied the III IMNCI, Training Course for Physicians from 17th to 24th November 2009. 23 physicians from Pune, Raigad, Satara, Solapur and Thane districts participated. Dr. G. A. Panse, Former Jt. Director, State Health Services and Senior Consultant for RCH II at KEMHRC, inaugurated the Training Course. Dr. S. S. Dodwad, State Training Consultant and Dr. Chandrakala Jaiswal, UNICEF Co-ordinator and Consultant (Child Health) were the Chief Guests for the validictory function. The IV course was conducted from 28th January 2010 to 04 February 2010 and had participants from 4 districts.

The annual Scientific Advisory Committee (SAC) meeting of the Research Centre, was held on Monday, 28th December 2009, under the Chairmanship of Dr. N.K. Ganguly, Former DG, ICMR.



Scientists presented work carried out by them during 2007-2008. This was followed by discussions and comments from SAC members and the Chairman. At the end of the meeting Dr. Ganguly made several suggestions for more active participation by our scientists in clinical research.

On 31st December 2009, our Consultants from RCH II, Dr. N. T. Kamthekar, Col. Hans Raj and Dr. Mrs. A. Bopardikar retired on completion of their tenure. We thank them for all the hard work put in by them to see that the RCH programme was successful. At the same time we welcome the following Consultants who form the new RCH team Dr. Deepak Phalgune (Medical), Dr. (Mrs.) Vaijayanti Patwardhan (Medical) Mr. Sandeep Raut (Management) and Mrs. S. Rajalakshmi (Finance).

There has also been a change in the editorial board. The earlier members have successfully completed their three year tenure. The editor would like to thank each one of them for having extended their whole hearted support to meet all the dead lines and extend a warm welcome to the incoming members.

**Dr. V. S. Padbidri**

## RCH II Project

**Meetings attended:**

Dr. Deepak S. Phalgune, Consultant (Medical), attended a meeting on 13th Jan 2010, at Parivartan Bhavan, Vishrantwadi, Pune called by Addl. DHS, FW, MCH & SH, Pune. The meeting was organized to discuss RCH PIP 2010-11. Dr. D. S. Phalgune made a power point presentation of the activities of KEMHRC for the month of December 2009.

**IMNCI training:**

Two IMNCI trainings for Physicians were organized at KEMHRC from 17/11/09 to 24/11/09 and from 28/01/10 to 04/02/10. In the first batch, 23 trainees from 5 districts participated in the training. A field visit was organized to Theur Subcentre, AWS & Home visits at Theur.

The trainees were also given "hands on training" at NICU and Paediatric ward of KEM Hospital.

In the second batch, there were 24 trainees from 4 districts. The field visit was organized to Kunjeerwadi PHC, Theur Subcentre, AWS & Home visits at Theur.





**The following facilitators were involved in the training:**

1. Dr. (Col) Hans Raj
2. Dr. (Mrs) Pramila Menon
3. Dr. Yogesh Khachane
4. Dr. Hanamant Kulkarni
5. Dr. D. G. Darshane

**Visits by Consultants:**

Dr. N. T. Kamthekar, Dr. (Mrs) A. S. Bopardikar, Dr. Deepak S. Phalgune, Dr. Vaijayanti Patwardhan and Mr. Sandeep Raut visited the following places to monitor RCH-II training.

| Sr. No. | Dates | Place | Type of training monitored |
|---|---|---|---|
| 1 | 09/11/09 | Civil Hospital Thane | BEmOC |
| 2 | 17/12/09 | Hospital Training Centre of P.V.P., Govt. Medical College & General Hospital, Sangli | SAB |
| 3 | 18/12/09 | Block Training Centre Islampur (Dist. Sangli) | ASHA |
| 4 | 18/12/09 | Indira Gandhi Memorial Hospital Ichalkaranjee (Kolhapur) | SAB |
| 5 | 19/12/09 | C.P.R. Hospital, Rajeshree Chatrapati Shahu Maharaj Govt. Medical College, Kolhapur | BEmOC |
| 6 | 20/12/09 | Sub Dist. Hospital Sawantwadi (Sindhudurg) | BEmOC |
| 7 | 21/12/09 | Block School Malvan (Sindhudurg) | IYCN |
| 8 | 22/12/09 | Dist. Trg. Centre (Ratnagiri) | IMNCI(H/N) |
| 9 | 23/12/09 | Block Trg. Centre Savarda Walawalkar Hospital Dervan Tal. Chiplun Dist. Ratnagiri | IMNCI (H/N) |
| 10 | 16/01/10 | Sw. Krantisingh Nanasaheb Patil General Hospital Satara and District Training Centre, Satara | BEmOC, Minilap<br>IMNCI (H/N) |
| 11 | 22/01/10<br>23/01/10 | Tarachand Ayurvedic Hospital, Pune and Sonawane Hospital Pune | IMNCI (H/N)<br>Minilap |

**Investigators meetings attended by Investigators in Pediatrics Dept.**

| Sr. No. | Study | Place | Date | Attendees |
|---|---|---|---|---|
| 1 | MMRV-GSK | Mumbai | 26/08/09 | Dr. A.Bavdekar<br>Dr. A. Sapru<br>Dr. K. Dhiware |
| 2 | H1N1-GSK | Bangalore | 15/11/09 | Dr. A. Sapru<br>Dr. R. Patrikar |
| 3 | H1N1-Serum | Mumbai | 12-13/12/09 | Dr. A. Sapru<br>Dr. K. Deshpande |
| 4 | H1N1-GSK-Efficacy | Singapore | 12/1/10 | Dr. A. Sapru<br>Dr. M. Pawar |
| 5 | National Ped Conference Panelist for seminar on "Probiotics in Pediatric practices: Current concepts | Hyderabad | 6-9/1/10 | Dr. S. Bhave |

**Dr. Sheila Bhave:**

- Wrote a Chapter on "Guidelines in use of Probiotics in Pediatric Practice" in textbook, "Probiotics in Pediatric practice: Current concepts" (Elsevier Publications, 2010 released) at Pedicon 2010

### इम्पॅक्ट यु. के. सदस्य यांची प्रकल्पास भेट

दिनांक २२/१२/२००९ रोजी हवेली तालुक्यातील खेडशिवापूर व आर्वी गावाला डॉ. विनीत शहा इम्पॅक्ट यु. के. सदस्य व श्रीमती हेमा उदेशी इम्पॅक्ट यु.के. च्या सल्लागार यांनी अपंगत्व पुनर्वसन कार्यक्रमांतर्गत चाललेल्या कार्याची पहाणी प्रत्यक्ष ग्रामीण भागात जावून केली. डॉ. शहा यांनी प्रथम प्रकल्पाचे संचालक आणि प्रकल्पाचे समन्वयक यांच्याशी चर्चा केली. डॉ. शहा यांनी मुख्यत्वे करुन प्रतिबंधात्मक कार्य करण्याचे सुचविले.



किशोरी मुलींसाठी हिमोग्लोबीन तपासणी व आहाराविषयी कार्य करण्याचे सुचित केले. तसेच त्यांनी "इरा" शिक्षण मंडळ संचालित बी. एड. कॉलेज मधील प्रशिक्षण घेत असलेल्या मुलींना मार्गदर्शन केले. त्यानंतर त्यांनी अपंगत्व प्रतिबंध व पुनर्वसन प्रकल्पातील शस्त्रक्रिया व साहित्य मिळालेल्या लाभार्थी व त्यांच्या पालकांशी चर्चा केली व अपंगत्व प्रतिबंध व पुनर्वसन कार्यक्रमाला शुभेच्छा दिल्या.

### हार्क शिबीर कार्यक्रम प्रा. आ. केंद्र निरवांगी, ता. इंदापुर, जि. पुणे

या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश असा की, मुलांमधील ऐकण्यातील सदोषता लवकरात लवकर शोधून काढण्यासाठी अपंगत्व प्रतिबंध व पुनर्वसन कार्यक्रमांतर्गत ० ते ६ वर्ष वयोगटातील लाभार्थींची निवड केली जाते.

हे शिबिर पुणे जिल्हयातील इंदापुर तालुक्यातील निरवांगी प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये दिनांक १५ डिसेंबर २००९ रोजी घेण्यात आले. कार्यक्रम घेण्याअगोदर मी तेथील प्रा. आ. केंद्रातील वैदयकीय अधिकारी, तालुका वैद्यकिय अधिकारी व सर्व कर्मचारी वर्गाची सभा घेतली. त्यामध्ये शिबिराबद्दल सविस्तर असे मार्गदर्शन केले. या शिबीरामध्ये कोणती मुले येणे अपेक्षित आहे. (१) ० ते १ महिना नवीन जन्म झालेली प्रा. आ. केंद्र कार्यक्षेत्रातील सर्व मुले (२) १ महिना ते ६ वर्ष प्रा.आ.केंद्र कार्यक्षेत्रातील सर्व संदर्भीत मुले (३) १ ते ६ वर्ष स्थानिक (ज्या ठिकाणी कॅम्प घेतला जाणार आहे). त्या अंगणवाडीतील मुले या प्रकारची मुले शिबीरासाठी येणार असे गृहीत धरुन वैद्यकिय अधिकारी व आरोग्य कर्मचारी वर्गानी शिबिराची तारीख निश्चित केली आणि तशा प्रकारची मुले शिबिरादिवशी उपस्थित ठेवण्याविषयी सूचना दिली.



नंतर वरील प्रकारचे लाभार्थी उपस्थित ठेवण्याबाबत प्रा. आ. केंद्र कार्यक्षेत्रातील सर्व अंगणवाडीची सभा अंगणवाडी सुपरवायझर व आरोग्य सुपरवायझर यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आली व शिबिरा दिवशी मुलांना उपस्थित ठेवण्याविषयी सांगण्यात आले. तसेच गावचे सरपंच, ग्रामसेवक, प्रतिष्ठीत नागरीक यांना शिबिराविषयी कल्पना देण्यात आली. त्याप्रमाणे दि. १५/१२/०९ रोजी के.ई.एम. हॉस्पिटल संशोधन केंद्र पुणे यांच्या अपंगत्व प्रतिबंध व पुनर्वसन कार्यक्रमांतर्गत इंदापुर तालुक्यातील निरवांगी प्रा. आ. केंद्र, ० ते ६ वयोगटातील १७५ मुलांची मोफत तपासणी ऑडीलॉजीस्ट श्री. आशुतोष दुबे यांनी "हार्क" फिरत्या ॲम्ब्युलन्समार्फत केली.



या कामी के.ई.एम. हॉस्पिटल संशोधन केंद्राचे संचालक मा. डॉ. व्ही. एस. पडबिद्री साहेब व इम्पॅक्ट यु. के च्या प्रतिनिधी श्रीमती हेमा उदेशी मॅडम व मा. अे . डी. दुधाने वरिष्ठ संशोधन अधिकारी या सर्वांच्या मार्गदर्शनामुळे व तालुका वैद्यकिय अधिकारी, प्रा. आ. केंद्राचे वैद्यकिय अधिकारी, आरोग्य सेवक, सेविका आशा सेविका, एकात्मिक बालविकास योजनेचे (ICDS) चे सुपरवायझर, अंगणवाडी सेविका, माझे सहकारी श्री. अर्जुन खाडे व इतर सर्वांच्या सहकार्यामुळे व सहभागामुळे या ठिकाणचे शिबिर यशस्वी करु शकलो.

अशा प्रकारे हार्क गाडीच्या शिबिराबद्दल माहिती सांगता येईल. सर्व नवजात बालकांनी या उपक्रमाचा फायदा घ्यावा.

श्री. डी.एस. पवार
जिल्हा समन्वयक, वाशिम

## अपंगत्व प्रकल्पातून ०-६ वयोगटातील मुलांचे पुनर्वसन

अपंगत्व प्रतिबंध व पुनर्वसन कार्यक्रमात सन २००८-२००९ या वर्षासाठी जळगाव जिल्हयातील १५ तालुक्यातील प्रकल्पाच्या २००० मुख्यसेविका व अंगणवाडी ताईना प्रशिक्षण देवून ०-६ वयोगटातील मुलांची प्राथमिक तपासणी करण्यात आली त्यात त्यांना ३६४० मुले सदोष आढळून आली, पैकी १५६२ मुलांना तज्ञांचा सल्ला देण्यात आला.

अशा विशेष मुलांसाठी जिल्हा रुग्णालयाची व के.ई.एम हॉस्पिटल संशोधन केंद्रांतर्गत एच. व्ही. देसाई यांच्या अस्थिरोग, कान नाक घसा व नेत्र तज्ञांनी सर्व १५ तालुक्यात शिबिरे घेऊन ०-६ वयोगटातील मुलांची साधने व शस्त्रक्रियेसाठी निश्चिती केली.

| प्रकार | एकूण संदर्भीत मुले | शस्त्रक्रिया झालेली मुले | साधने मिळालेली मुले |
|---|---|---|---|
| अस्थिव्यंग | ७५ | ४७ | १७ |
| नेत्र | १४५ | ३१ | ४१ |
| कान, नाक, घसा | १५७ | ०८ | ३७ |



अशा पध्दतीने निश्चिती केलेल्या मुलांना सेवा मा. मुख्यकार्यकारी अधिकारी व उप मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी वरील सेवा मिळालेल्या लाभार्थीसाठी पुणे येथे जाण्यायेण्याचा प्रवासखर्च सर्व शिक्षा अभियानांतर्गत करण्यात आला. अशा संदर्भीत केलेल्या मुलांना के.ई.एम. हॉस्पिटल संशोधन केंद्राने नेमलेल्या स्वयंसेवी संस्थाच्या माध्यमातून सर्व ०-६ वयोगटातील लाभार्थींना मोफत सेवा मिळवून देण्यात आली. या कार्यासाठी सर्व शिक्षा अभियानाचे जिल्हा समन्वयक, एकात्मिक बालविकास योजनेचे (ICDS) प्रकल्प अधिकारी व मुख्यसेविका यांनी सहकार्य केले.

**श्री. खाडे ए. डी.**
**जिल्हा समन्वयक, जळगाव**

## रुबेला प्रतिबंधक लसीबद्दल शालेय मुलींचे मनोगत

कुमारी- रोडे स्वप्नाली मारुती
कुमारी- तांबे पुनम रमेश
कुमारी कुशेकर वैशाली विलास
व्ही. पी. नाईक हायस्कूल, नांदूर शिंगोटे
ता. सिन्नर, जिल्हा- नाशिक

मनोगत -
अपंगत्व प्रतिबंध व पुनर्वसन प्रकल्पांर्गत प्रथम रुबेला लसीकरणाविषयी काहीही कल्पना नव्हती. ती कल्पना आम्हाला आमच्या माध्यमिक विद्यालयामध्ये येऊन दिली. रुबेला लसीकरणा-विषयी प्रथम आमच्या मनामध्ये भीती होती. जेव्हा रुबेलाबद्दल आम्हाला मार्गदर्शन केले तेव्हा आमच्या मनातील भीती दूर झाली आहे.



रुबेला लसीकरण प्रथम आमच्या माध्यमिक विद्यालयामध्ये आले, तेव्हा आमच्या मनात काही शंका येत होत्या. तेव्हापासून आम्हाला काही आजार होतील अशी शंका मनात रुजू लागली.रुबेला लस टोचल्यावर आम्हाला काही माहीती दिली. त्यामुळे आमच्या मनातील भिती व शंका होती ती नाहीशी झाली. या लसीबद्दल आम्हाला असे सांगितले की रुबेला कोणाला होतो, त्या रोगाची लक्षणे कोणती, त्यावरील उपचार कोणते, यासाठी कोणकोणत्या तपासण्या कराव्या लागतात इ. उदा: रुबेला गरोदरपणात झाला तर गर्भाला जन्मत: मोतीबिंदू , बहिरेपणा, मतीमंद व ह्दयालाछिद्र इ. धोक्यांविषयी सर्व मार्गदर्शन आम्हाला दिले गेले. हे सर्व आजार रुबेलाच्या लसीकरणामुळे निश्चित टळू शकतात.
रक्तामध्ये प्रतिजैवके आहेत किंवा नाहीत हयाची तपासणी करावी लागते. परंतु या तपासण्या न परवडणाऱ्या आहेत म्हणून त्यासाठी प्रतिबंध म्हणून रुबेला लस टोचून घेणे उत्तम, यासाठी आम्हाला मार्गदर्शन केले व आमच्या माध्यमिक विद्यालयामध्ये रुबेला लसीकरण व तपासणी आयोजित केली.रुबेला लसीकरण केल्यामुळे आम्हाला भावी आयुष्यात फायदाच होणार आहे. आणि सरकारने सुध्दा त्यासाठी प्रयत्न करावेत.

**श्री. एस. आर. शिवले**
**जिल्हा समन्वयक, अमरावती, नाशिक**

**Current status of on going courses in Pabal Centre**

| Sr. No. | Name of Course | Batch | Total |
|---|---|---|---|
| A | Computer Skills | Batch III Dec. 09 to Feb. 10 | |
| | | 1. DIT (Basic) | 02 |
| | | 2. Tally 7.2 | 09 |
| | | 3. DTP | 05 |
| B | Food Proc. & Quantity Cooking | Batch III Dec. 09 to Feb. 10 | 16 (Kanersar) |
| | | Batch IV Jan. 10 to Mar. 10 | 30 (Shikrapur) |
| C | Home Nursing | Batch II Dec. 09 to May 10 | 16 |

महिला सर्वांगीण विकास प्रशिक्षण केंद्र पाबळ यांचेतर्फे दि. ११ डिसेंबर २००९ रोजी कनेरसर आणि दि. ०७ जानेवारी २०१० रोजी शिक्रापूर या ठिकाणी अन्न व फळ प्रक्रिया प्रशिक्षण कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी कनेरसर गावचे सरपंच श्री. हनुमंत दौंडकर, पोलिस पाटील श्री. मोहन दौंडकर, सौ. श्रद्धा देशपांडे उपस्थित होते.



शिक्रापूर येथिल प्रशिक्षण कार्यक्रमाचे उद्घाटन प्रसंगी डॉ. व्ही. एस पडबिद्री डायरेक्टर रिसर्च, सौ. राजलक्ष्मी रंगन वरिष्ठ प्रशासकिय अधिकारी, श्री. खंडेराव करंजे सामाजिक कार्यकर्ते आणि ३० महिला प्रशिक्षणार्थी उपस्थित होत्या.

गृहपरिचारिका प्रशिक्षण वर्गाचा कालावधी सहा महिन्यांचा असून प्रथम बॅचच्या प्रशिक्षणार्थी, तसेच अन्न व फळ प्रक्रिया आणि संगणक कौशल्य वर्गाचा कालावधी तीन महिन्यांचा असून या वर्गाची दुसरी बॅच यशस्वीपणे पूर्ण झाल्यानंतर प्रमाणपत्र वितरणाचा कार्यक्रम दि. १२ डिसेंबर २००९ रोजी प्रशिक्षण केंद्र पाबळ या ठिकाणी पार पडला त्यावेळी श्री. रामचंद्र देशपांडे, सचिव एल ॲन्ड टी पब्लिक चॅरिटेबल ट्रस्ट मुंबई, डॉ. व्ही. एस. पडबिद्री डायरेक्टर रिसर्च, सौ. राजलक्ष्मी रंगन, वरिष्ठ प्रशासकिय अधिकारी या मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्र वितरण करण्यात आले.



जीवन शिक्षण मंदिर प्रकल्पांतर्गत लार्सन ॲन्ड टुब्रो पब्लिक चॅरिटेबल ट्रस्ट यांनी महिला सर्वांगीण विकास प्रकल्प, भैरवनाथ विद्यामंदिर, विज्ञान आश्रम पाबळ, सयाजीराव गायकवाड पिंपळे जगताप या ठिकाणी निवडक १५४ पुस्तकांचा संच आणि अष्टविनायक व तेजस्विनी महिला स्वयंसहाय्यता गट कनेरसर, भैरवनाथ महिला स्वयंसहाय्यता गट पिंपळवाडी, महालक्ष्मी व अहिल्याबाई महिला स्वयंसहायता गट धामारी या ठिकाणी निवडक ५५ पुस्तकांचा संच देणगी

स्वरूपात दिले आहेत. यामध्ये आरोग्य, शेती, चरित्र, शिक्षण, व्यक्तिमत्व विकास, करिअर मार्गदर्शन, प्रशिक्षणार्थी व पालक यांना वाचनासाठी मोफत उपलब्ध करून देण्यात आली आहेत.



मी शितल नामदेव जाधव, राहणार पाबळ, माझी आई दुसरी शिकलेली व वडील दहावी पास. मला एक बहिण व एक भाऊ, सर्वात लहान बहिण दहावी नापास. भाऊ खाजगी कंपनीत काम करून शिक्षण घेतो. शेती जेमतेम दीड एकर ती सुद्धा पावसाच्या पाण्यावर अवलंबून.



मी पाचवी पर्यंत शाळेत गेले. पाचवी पास झाले. वडील म्हणाले आता शाळा बास झाली. शाळेत जायचे नाही म्हणून मी खुप रडले, जेवले नाही. तशीच झोपले. दुसऱ्या दिवशी वडिल गावात गेले, आई म्हणाली तू शाळेत जा. मी भीतभीत शाळेत जावू लागले. सातवीत गेल्यानंतर स्कॉलरशिपची परिक्षा होती. मला फार वाटायचं आपण परिक्षेला बसावे, पण वडिलांनी पैसे नाही म्हणून सांगितले. मला परिक्षा देता आली नाही. आई प्रोत्साहन द्यायची. त्यामुळे दहावी नापास पर्यंत शिक्षण झाले. त्यामुळे मी शेतात कामाला जाऊ लागले. काम करण्यावरून थोडा वाद झाला. आईला न सांगता मी मैत्रिणीकडे जावून बसले. गप्पा मारत असताना मैत्रीण म्हणाली के.ई.एम. पाबळ मध्ये गृहपरिचारिका कोर्स चालू झाला आहे. मी जाणार आहे तुला यायचं का चल. लगेच आम्ही दोघी के.ई.एम.मध्ये चौकशीला आलो. मी घरी आईला न सांगता तशीच आले. परंतु रविवार असल्याचे भान नव्हते. के.ई.एम.मध्ये आल्यावर कळले की आज सुट्टी आहे. परत दुसऱ्या दिवशी सोमवारी येवून ॲडमिशन घेतली. प्रत्येक गोष्टीत वडिलांचा नकार होता. आई मला प्रोत्साहन देत होती. मी क्लासला येवू लागले. पण अभ्यासक्रमातील अवघड शब्द पाहून मला जमेल का ? मी करू शकणार नाही असे वाटले म्हणून मी घरी राहिले. परंतु राऊत मॅडमनी मला बोलावून घेतले, समजावून सांगितले.

माझा स्वभाव खूप रागीट होता. छोट्या छोट्या गोष्टींसाठी वर्गातील मैत्रीणींशी सतत भांडण होत होते. परंतु मॅडमच्या वारंवार मार्गदर्शनाने व मी स्वतः विचार केल्याने माझेच काहीतरी चुकते याचा उलगडा होत गेला. थोड्याच दिवसात मी सर्वात मिसळुन गेले. आता मात्र मला ताबडतोब राग येत नाही.

प्रॅक्टिकलसाठी एक महिना वढू हॉस्पीटल येथे जावे लागले. ही तर आम्हाला संस्कार शिदोरीच होती. गाडीतून एकत्रित प्रवास, आपापसात खाऊ वाटप, एकमेकांची प्रवासातील काळजी आणि प्रत्यक्ष वढू हॉस्पीटल मधील कामकाज तेथील शिस्त, डॉक्टरांनी व कर्मचाऱ्यांनी दिलेले प्रोत्साहन यामुळे आम्ही खूपच खुलून गेलो. कधी आपण कामाला सुरूवात करतो असे वाटू लागले.

प्रशिक्षण संपले. निरोप समारंभ कार्यक्रमाचे वेळी

आम्हाला पिंगळे सरांनी माहिती दिली तळेगाव व शिक्रापुर येथे खाजगी हॉस्पीटलमध्ये नर्सची आवश्यकता आहे. मी व माझ्या इतर मैत्रिणींनी पटकन होकार दिला. राऊत मॅडम यांनी समक्ष येवून आमची व डॉक्टरांची भेट घडवून आणली. मी तळेगाव येथे डॉ. कदम यांच्याकडे काम करू लागले. दरमहा २००० रूपये पगार मिळतो. खूष होऊन आमची गैरसोय होऊ नये म्हणून डॉक्टरांनी ताबडतोब एक महिन्याच्या आत मी व माझे मैत्रिणींसाठी एक रूमचे बांधकाम सुद्धा सुरू केले आहे. लवकरच आम्ही तेथे राहण्यास जाणार आहोत.

मी व माझ्या मैत्रिणी खूपच खूष आहोत. कारण प्रशिक्षण काय कोठेही मिळेल पण प्रशिक्षणाबरोबर संस्कार फक्त डॉ. पडबिद्री सर व यांचे सहकारीच करू शकतात.

## Welcome to RCH-II team


Dr. Deepak Phalgune


Mr. Sandeep Raut


Dr. Mrs. Vaijayanti Patwardhan


Mrs. S. Rajalakshmi

## Glossary

| | | |
|---|---|---|
| BEmOC | : | Basic Emergency Obstetric Care |
| SAB | : | Skilled Attendance at Birth |
| ASHA | : | Accredited Social Health Activist |
| IYCN | : | Infant Young Child Nutrition |
| IMNCI | : | Integrated Management of Neonatal |
| (H/N) | : | Childhood Illness (Health / Nutrition) |
| Minilap | : | Minilaparotomy |

**Published by** : Dr. V. S. Padbidri for KEM Hospital Research Centre, Rasta Peth, Pune 411 011.
**Telephone** : 66037336 **FAX** : 26125603
**E-mail** : kemvnr@vsnl.net